# प्रकरण पाचवे

# प्रकरण पाचवे

# मूल्यमापन

कर्मवीर भाऊराव पाटील यांनी ४ ऑक्टोबर १९१९ रोजी रयत शिक्षण संस्थेची स्थापना करून आपल्या शिक्षण प्रसाराच्या कार्याला सुरूवात केली. हे शिक्षण प्रसाराचे कार्य म्हणजे एक खडतर व्रत होते. त्या काळात हजारो वर्षापासून ज्ञान व शिक्षणापासून वंचित राहिलेल्या बहुजन समाजातील अठरा पगड जातीच्या मुलामुलींना शिक्षण देणे एक सतीचे वाणच होते. उच्चवर्णीय सोडून इतरांनी शिक्षण घेणे म्हणजे पाप आहे. अशी मनोभुमिका बनलेल्या या समाजातील मुलांना शिक्षण घेण्यासाठी प्रवृत्त करणे खुपच अवघड होते. महात्मा फुले यांनी काही प्रमाणात हे कार्य केले. त्यानंतर शाहू महाराजांनीही याबाबतीत विधायक भूमिका घेऊन आपल्या संस्थानात शिक्षणाचा प्रसार केला. आतापर्यंत झालेले हे शिक्षण प्रसाराचे कार्य या महाराष्ट्राच्या भूमिचा विचार करता व अवाढव्य समाज पाहता अल्पसेच होते. त्या पार्श्वभूमीवर कर्मवीर भाऊराव पाटलांनी शिक्षण प्रसारासाठी 'रयत शिक्षण संस्थेची' केलेली स्थापना व पुढील काळात महाराष्ट्रात घडवून आणलेला शिक्षण प्रसार हा फार महत्त्वपूर्ण आहे.

कर्मवीर भाऊराव पाटलांनी शिक्षणासाठी लावलेले हे रोपटे जोमदारपणे वाढत गेले. शिक्षण क्षेत्रात या रोपट्याचा वृक्ष झाला व कालांतराने वृक्षाचा वटवृक्ष झाला. ज्ञानदेव घोलप या मागासवर्गीय विद्यार्थ्याला घेऊन पहिले वसतिगृह काढून आण्णांनी या शिक्षणकार्याची सुरूवात केली. पुढील काळात शेकडो प्राथमिक शाळा, माध्यमिक विद्यालये, महाविद्यालये तसेच आश्रमशाळा, वसतिगृहे, ट्रेनिंग स्कूल यांचा विस्तार महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात झाला. त्याकाळात एखाद्या समाजसुधारकाने कोणतीही सामाजिक चळवळ सुरू केली तर ती टिकाव धरत नसे. एखादी चळवळ टिकलीच तर ती त्या सुधारकाच्या मृत्युनंतर नामशेष होत असे. कारण असे सामाजिक कार्य चालविणे म्हणजे स्वत:च्या प्रपंचाची,

भरभराटीची व वैयक्तिक सुखाची होळी करण्यासारखेच असे. त्यामुळे ह्या सामाजिक चळवळी बंद पडल्याची महाराष्ट्रात अनेक उदाहरणे आहेत, परंतु कर्मवीरांनी सुरू केलेली ही शिक्षण चळवळ पुढील काळात नुसती वाढतच गेली नाही तर चांगलीच फोफावली. हे असे का घडले? याचा ज्यावेळी आपण साकल्याने विचार करतो, त्यावेळेस दिसून येते की, आण्णांनी शिक्षण प्रसाराचे कार्य करत असताना आपल्या वसतिगृहातून, शाळातून, आपल्या संस्कारांनी, आपले शिक्षण कार्य पुढील काळात वाढविण्यासाठी, तन–मन–धनाने आपल्या संस्थेशी एकरूप होणारे, अनेक विद्यार्थी कार्यकर्ते तयार केले. अशा कार्यकर्त्यांची मालिकाच आण्णांनी उभी केली होती. ॲड. मुल्लासाहेब, बॅ. पी. जी. पाटील, बापुसाहेब नलावडे, गणी आतार, ए. बी. मगदुम, ए. डी. साळुंखे अशा शेकडो क्रियाशील रयतसेवकांनी आण्णांनी उभे केलेल्या शिक्षण कार्याला आपापल्या परीने वाहून घेतले. या संस्थेचे बोधचिन्ह 'वटवृक्ष' आहे. वटवृक्षाची पारंबी जमीनीला टेकल्यानंतर ज्याप्रमाणे त्याचे खोड होते. त्या खोडाला फांद्या फुटून पुन्हा पारंब्या येतात व वटवृक्ष वाढत जातो. तद्वत आण्णांनी सुरू केलेली ही शिक्षण चळवळ वाढत जाऊन महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यापर्यंत, झोपडीपर्यंत पोहोचली. अशा या रयत कार्यास वाहून घेणाऱ्या सेवकामध्ये बॅ. पी. जी. पाटील यांचे नाव अग्रक्रमाने घेतले पाहिजे.

**रयतभूषण बॅ. पी. जी. पाटील :**

बॅ. पी. जी. पाटील बॅरिस्टर झाल्यानंतर छ. शिवाजी कॉलेजमध्ये १२० रू. मानधनावर 'ट्युटर' म्हणून नोकरीस लागले. कर्मवीर आण्णांच्या कार्याचा वसा स्वीकारल्यानंतर गुणवत्तेप्रमाणे काम किंवा दाम मिळावा किंवा मिळेल अशी अपेक्षा धरणेच चुकीचे होते, बॅ. पी. जी. सरांनी ती कधी धरलीच नव्हती. रयतमध्ये सोपवतील ते काम आणि चरितार्थ चालविण्यापुरता पैसा मिळाला की पुरे झाले. रयत शिक्षण संस्थेचा कार्यविस्तार वाढविणे, जास्तीत जास्त बहुजन समाजाच्या गोरगरीब मुलांना शिक्षण मिळावे म्हणून ते सदैव कार्यरत राहिले.

शिक्षण प्रसाराचे कार्य करत असतानाच ही शिक्षण संस्था पिढ्यान्‌पिढ्या चालावी, तिचे कार्य महाराष्ट्रभर पसरावे असे कर्मवीर आण्णांना वाटत होते. त्यासाठी निस्पृह, ध्येयवादी व संस्थेसाठी आपले जीवन समर्पित करणारी तरूणांची पिढी उभी राहिली पाहिजे, असे आण्णांना नेहमी वाटे. त्या दृष्टीने आण्णांनी जे युवक घडविले त्यामध्ये बॅ. पी. जी. पाटील यांची गणना होते. ते खऱ्या अर्थाने आपल्या कार्याने 'रयतपुत्र' व आण्णांच्या कार्याचे वारसदार ठरले. संभाजीराव बाबा थोरात तर बॅ. पी. जी. पाटील यांचा 'रयतभूषण' म्हणूनच उल्लेख करतात. ते म्हणतात, "बॅ. पाटील यांनी आपले शिक्षण पूर्ण करून कर्मवीर आण्णांची महत्वकांक्षा पूर्ण केली. त्यांनी संस्थेला आपले आयुष्य अर्पण केले. अशा कार्यरत ध्येयवादी माणसांची पिढी 'रयत' मध्ये आण्णांनी उभी केली, हेच कर्मवीरांच्या कार्याचे वैशिष्ट्य आहे."[१]

कोणत्याही संस्थेची, शाखेची उंची किंवा महत्त्व हे त्या ठिकाणी काम करणाऱ्या माणसांच्या बौद्धिक उंचीवर, आदर्श प्रशासनावर व सामाजिक बांधिलकीवर ठरत असते. यादृष्टीने बॅ. पी. जी. पाटील यांचे संस्थेशी नाते मोजावयाचे झाल्यास असे म्हणता येईल की, कर्मवीर भाऊराव पाटील व रयत शिक्षण संस्थेमुळेच बॅ. पी. जी. पाटील मोठे झाले. पण त्याचबरोबर बॅ. पी. जी. पाटील यांची बौद्धीक उंची, कर्तृत्त्व व अमोघ वक्तृत्त्व यामुळे ते अवघ्या महाराष्ट्रात प्रसिद्ध झाले. त्यामुळे रयत शिक्षण संस्थेचीही मान उंचावली व प्रसिद्धी झाली. बॅ. पी. जी. पाटलांसारख्या ज्ञानसमृद्ध व विद्वान माणसामुळेच रयत शिक्षण संस्था भरभराटीला आली. बॅ. पी. जी. पाटील हे खऱ्या अर्थाने आपल्या चारित्र्याने, त्यागी जीवनाने व ज्ञानोपासनेने रयत शिक्षण संस्थेचे भूषण ठरलेले होते.

### आदर्श व विद्यार्थीदक्ष प्राध्यापक :

बॅ. पी. जी. पाटील हे छ. शिवाजी कॉलेजमध्ये नोकरीस लागल्यानंतर अल्पकाळातच अतिशय चांगल्या पद्धतीने इंग्रजी शिकविणारे प्राध्यापक म्हणून त्यांचा विद्यार्थ्यांच्यात नावलौकीक झाला. त्यांचा तास

म्हणजे विद्यार्थ्यांना एक बौद्धीक मेजवाणी वाटे. अधुनमधून हास्याची कारंजी उडवीत आपल्या विषयासंबंधी अनेक उदाहरणे देत त्यांची वाक्‌गंगा तास्‌नतास वाहत असे. ते शिकवायला उभे राहिले म्हणजे तास दोन तास सतत शिकवत असत. छत्रपती शिवाजी कॉलेजला एम.ए. चे वर्ग निघाल्यानंतर महाराष्ट्रातील निरनिराळ्या ठिकाणावरून विद्यार्थी शिक्षण घेण्यासाठी येथे आले. त्यांच्या पत्नी सौ. सुमतीबाईही त्यांच्या तोलामोलाच्या होत्या. प्राचार्य झाल्यावरही दोघे पती—पत्नी वर्गावर तास घेत असत. एम. ए. एन्टायर इंग्रजीचे वर्ग सातारा व कराड येथे चालवत असताना हे वर्ग शनिवार, रविवारी भरत असत. २३ वर्षे त्यांनी शनिवार व रविवारची सुट्टी तास घेण्यात घालवली. या कामाबद्दल त्यांनी जादा मानधनही घेतले नाही. या वर्गातून शेकडो विद्यार्थी बाहेर पडले व महाराष्ट्रातील विविध कॉलेजवर ते अध्यापन करत आहेत. या दोघांच्यामुळे एम. ए. इंग्रजी एन्टायरचे वर्ग नावारूपाला आले. या उभयतांच्या शिकवण्याबद्दल दिनकर पाटील म्हणतात, “या दोघा पती—पत्नीची शिकविण्याची धाटणी एकदम वेगळी होती. प्राध्यापक पाटलांचे इंग्रजी चांदण्यासारखे व रोमांचकारक होते. तर सौ. पाटलांचे इंग्रजी म्हणजे रावळातलं नंदादीप! एकदम शांत, सखोल व सोप्या भाषेत समजावून सांगणारे होते.”[२]

अध्यापनाच काम करताना बॅ. पी. जी. पाटील यांनी तन—मन—धन अर्पण करून कार्य केले. समाजासाठी येणारा काळ उज्वल आणावयाचा असेल तर तरूण पिढी घडवावी लागते. तेच कार्य त्यांनी केले. रयत शिक्षण संस्था ही पश्चिम महाराष्ट्रातील महत्त्वपूर्ण संस्था आहे. बॅ. पी. जी. पाटील हे याच संस्थेचा एक कार्यकर्ता होते. “त्यांनी रयत शिक्षण संस्थेच्या प्रत्येक टप्प्यावर घेतलेल्या भूमिका लोभस होत्या. राज्यातील महाविद्यालयांना प्राध्यापक पुरविण्याचे काम संस्थेने केले असून, त्यामध्ये बॅ. पाटील यांचे योगदान मोठे आहे.” असे रयत शिक्षण संथेचे चेअरमन प्रा. एन. डी. पाटील म्हणतात.[३] बॅ. पी. जी. पाटील यांनी अध्यापन करताना विद्यार्थ्यांना चारित्र्य, नैतिकता अशा मुल्यांची जोपासना

करून सामाजिक भान ठेवण्याची शिकवण दिली. त्यांनी समाजप्रबोधनपर अनेक व्याख्याने दिली. त्याबाबत माजी कुलगुरू रा. कृ. कणबरकर म्हणतात, "बहुजन समाजाचा सच्चा मार्गदर्शक म्हणून बॅ. पी. जीं. नी काम केले. ते बॅरिस्टर झाले; मात्र त्यांनी बहुजन समाजाची सेवा करण्याचाच मार्ग स्वीकारला. जगतात खुप; परंतु समाजासाठी खऱ्याने जगावे कसे याचा आदर्श त्यांनी निर्माण केला." अशा पद्धतीने त्यांनी सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात कामगिरी केली होती.[४]

बॅ. पी. जी. पाटील हे जसे शिकविण्यास चांगले होते तद्वतच विद्यार्थीदक्ष प्राध्यापक होते. आपल्या मुलाप्रमाणे विद्यार्थ्यांना कसे सांभाळावे याचा धडा त्यांना कर्मवीर आण्णांच्याकडूनच मिळालेला होता. शिवाजी कॉलेजचे रेक्टर असताना ते वसतिगृहातील सर्व मुलांची काळजी घेत. त्यांच्या अडी—अडचणी सोडवत. त्याकाळातील आठवणी सांगताना प्राचार्य आर. डी. गायकवाड म्हणतात. "छ. शिवाजी कॉलेजच्या वसतिगृहाचे रेक्टर म्हणून बॅ. पी. जी. पाटील होते. एक 'बॅरिस्टर' आपल्या वसतिगृहाचे रेक्टर आहेत. याचेच आम्हा विद्यार्थ्यांना अप्रुप वाटे. वसतिगृह असो, कॉलेज असो. बॅ. पी. जी. सर आमचे आकर्षण झाले होते. सरांची आमच्या समोर अनेक बौद्धीके होत, त्यावेळी प्रत्येकाची ओळख करून घेत. कधी—कधी आमच्या घराकडची विचारपूस करीत. आपल्या घरी बोलावून आम्हा विद्यार्थ्यांना खायला—प्यायला देत असत. दूरवरून खेड्यातून आलेल्या आम्हा विद्यार्थ्यांवर त्यांची प्रेमाची पाखर असे. त्यामुळे घरापासून लांब असूनही आम्हाला सरांचा आधार वाटे. संपूर्ण वसतिगृहच एक कुटुंब झाले होते. आजही ते दिवस आठवले की 'रम्य तो काळ सुखाचा' असे वाटते."[५]

'कमवा व शिका' योजनेत काम करणाऱ्या विद्यार्थ्यांना ते पेलेल असे काम देत असत. कधी — कधी खडी फोडणाऱ्या मुलांचे हात बघत आणि म्हणत, 'मळलेल्या हातात जीवनाचे संगीत असते.' व पोरांच्या पाठीवरून हात फिरवत. त्यामुळे मुलांच्यात आपुलकी निर्माण होऊन त्यांचा कंटाळा कुठल्या कुठे पळून जाई. एखाद्या विद्यार्थ्याकडून चूक झाल्यास ते

त्याला समजावून सांगत परंतु त्यांनी त्याला कधीही दंड केला नाही. कारण आण्णा म्हणत विद्यार्थ्यांना दंड म्हणजे त्याच्या गरीब आई—वडिलांना दंड आहे. म्हणून विद्यार्थ्यांना दंड करू नये. हेच तत्त्वज्ञान बॅ. पी. जी. सरांनी स्वीकारले होते. ते विद्यार्थ्यांना भरपूर मदत करत परंतु विद्यार्थ्यांच्या हुल्लडपणाला व आगाऊपणाला क्षमा करत नसत. विद्यार्थ्याने शिस्तप्रिय राहून ज्ञानात आपली उंची वाढवली पाहिजे असे त्यांना नेहमीच वाटत असे. ज्ञानासाठी धडपडणारी, अभ्यासात पहिली येणारी व सुसंस्कार असलेली मुले त्यांना आवडत असत. अशा विद्यार्थ्यांना त्यांनी सदैव प्रोत्साहन दिलेले आहे. आजही त्यांच्या हाताखाली शिकून गेलेले विद्यार्थी वेगवेगळ्या क्षेत्रात व मोठ्या पदांवर काम करत आहेत. शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू रा. कृ. कणबरकर म्हणतात, "बॅ. पी. जी. पाटील व सौ. सुमतीबाई पाटील हे हाडाचे शिक्षक आहेत. दोघांनीही जाणीवपुर्वक हा व्यवसाय निवडला. म्हणून विद्यार्थी जगतात दोघांनीही अढळ स्थान निर्माण केलेले आहे."[६]

आर्थिकदृष्ट्या दुर्बल असणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांनी सदैव मदत केली. एम. जी. निकम, प्रभाकर लांडगे यासारख्या विद्यार्थ्यांना घरात आश्रय देऊन त्यांचा खर्च भागवला. त्यांचे शिक्षण पूर्ण केले. एवढेच नव्हे तर त्यांची लग्नेही लावून दिली. या लग्नात बॅ. पी. जी. सर व सौ. सुमतीबाई पाटील यांनी वरपित्यांच्या भूमिका बजावून कार्य पार पाडले. अशा अनेक विद्यार्थ्यांची त्यांनी काळजी घेतली. अगदी आपल्या मृत्युपत्राच्या वाटणीतही त्यांना स्थान दिल्याचे दिसते.

## यशस्वी प्राचार्य व आदर्श प्रशासक :

बॅ. पी. जी. पाटील हे छत्रपती शिवाजी कॉलेज, सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज, कोल्हापूरचे छत्रपती शाहू कॉलेज अशा विविध ठिकाणी प्राचार्य म्हणून काम करत होते. प्राचार्य म्हणून त्यांची कारकीर्द यशस्वी ठरलेली आहे. प्राचार्य म्हणून काम करताना विविध आघाड्यांवर तोंड द्यावे लागते. विद्यार्थ्यांच्या समस्या, कॉलेजचे प्रशासन तर काही वेळा कामचुकार प्राध्यापकांना कामास लावणे व आर्थिक अडचणी या सर्व

प्रश्नांना सामोरे जावे लागते. या सर्व कसोट्यातून बॅ. पी. जी. पाटील हे पुढे गेले. आपल्या व्यक्तीमत्त्वाचा दरारा, अध्यापनातून विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण केलेला आदरभाव व विशुद्ध चरित्र्याचे तेज यामुळे ते प्रत्येक आघाडीवर यशस्वी झाले. प्राचार्य म्हणून असो अगर कुलगुरू म्हणून असो त्यांनी विद्यार्थ्यांच्या गोंधळाला, मोर्चाला अगदी यशस्वीपणे तोंड दिले. एकदा कोल्हापूरच्या शाहू कॉलेजच्या स्नेहसंमेलनावेळी मुलांनी केशवराव भोसले नाट्यगृह प्रचंड गोंधळ घालून डोक्यावर घेतले. त्यावेळी पोलिस हातात काट्या घेऊन धावत आले, परंतु बॅ. पी. जी. सरांनी त्यांना बाजूला सारून स्वत: मुलांच्यासमोर गेले व क्षणार्धात सर्वांना शांत केले. हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचाच भाग होता. एकदा एका प्राध्यपकाने एका टारगट मुलाच्या थोबाडीत मारली. अनेक मुलांच्या पुढे ही घटना घडल्याने तो मुलगा संतप्त होऊन सुडाने पेटला व तडक प्राचार्यांच्या कार्यालयात घुसला. आता काहीतरी घडणार असे सर्वांना वाटत होते. ऑफिससमोर मुलांची गर्दी जमली होती. दहा पंधरा मिनिटे गेली आणि बॅ. पी. जी. पाटलांसहीत तो मुलगा स्मितहास्य करतच बाहेर आला. सरांनी त्याला कसे समजावले ते देव जाणे.[७] १९७३ साली महाराष्ट्र — कर्नाटक सीमाप्रश्नावरून गोंधळ सुरू झाला होता. त्यावेळी सातारच्या फौजदार साहेबांनी प्राचार्यांना विनंती करून सांगितले की, “सर तुमच्या कॉलेजचे बरेच विद्यार्थी या गोंधळात व दंगलीत सामील आहेत, प्लिज तुम्ही त्यांना आवरू शकता का?” यावर सरांनी ते आवाहन स्वीकारले व तात्काळ ते शांतता प्रस्थापित करण्यासाठी ऑफिसमधून बाहेर पडले. त्यावेळी झाडाझुडपात लपून बसलेली सर्व मुले बाहेर आली. या सर्वांना वर्गात नेले व सुमारे तीन तास त्यांना बौद्धीक दिले. त्यामुळे मुले अंतर्मुख झाली व त्यांनी शांतता प्रक्रियेस सहकार्य केले. मोठ्या विद्यार्थी संख्येवर आपल्या व्यक्तीमत्त्वाचा नैतिक, बौद्धिक व आदरयुक्त दबदबा निर्माण करणारे असे व्यक्तीमत्त्व क्वचितच असू शकते.[८]

प्राचार्य म्हणून विविध कॉलेजवर काम करत असताना ते यशस्वी प्राचार्य होण्यापाठीमागे आणखी एक महत्त्वाचे कारण म्हणजे त्यांची

शिस्त व आदर्श प्रशासन होय. सर कडक शिस्तीचे भोक्ते होते. सरांचे कॉलेजच्या आवारात आगमन झाल्याबरोबर मोकळ्या पटांगणात हिंडणाऱ्या विद्यार्थी व विद्यार्थीनींची एकच तारांबळ उडत असे व त्यांच्यात, "अरे सर आले — चला वर्गात चला नाही तर लायब्ररीत चला अशी वाक्य उमटत असत." सर्व विद्यार्थी लायब्ररीत अगर अभ्यासिकेत जाऊन बसत असत. सरांनी कधीही एखाद्या विद्यार्थ्याला कठोर शिक्षा केलेली नव्हती. परंतु त्यांच्या प्रभावी व्यक्तीमत्त्व व शिस्तप्रिय वर्तनानेच विद्यार्थ्यांच्यावर आपोआप वचक निर्माण होई व ते शिस्तीने वागत असत.

ऑफिसमधील कर्मचारी वर्ग सुद्धा अतिशय शिस्तप्रियतेने वागत असे पी. के. देसाई तत्कालीन आठवणी सांगताना म्हणतात, "सरांचा कर्मचारी वर्गावर चांगलाच दबदबा असे. सर ऑफिसमध्ये आल्यावर कर्मचाऱ्यांच्या हृदयाचे व नाडीचे ठोके आपोआप वाढलेले असायचे, सर मात्र काही बोलत नसत. मात्र कर्मचाऱ्यांकडून चुका झाल्यावर ते त्याला चांगलीच समज देत असत. कच्चे पत्र करताना (ड्राफ्टींग) कागद कमी कसा वापरावा. अगदी साधी पिनही असो त्याचा दुरूपयोग होऊ नये यावर सरांचा कटाक्ष असे. सर्व व्यवहार अतिशय काटकसरीने चालत असे. सरांचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे निरनिराळ्या खात्याकडून आलेल्या पत्रांची उत्तरे वेळच्या वेळी गेलीच पाहिजेत. यात दिरंगाई झालेली सरांना खपत नसे. अगदी टायम टू टायम व वेळच्या वेळी कामे करणे व करून घेणे हे सरांचे वैशिष्ट्य होते."[९]

**उत्तम वक्ता :**

महाराष्ट्रामध्ये जे अनेक नामवंत वक्ते होऊन गेले आहेत. त्यामध्ये बॅ. पी. जी. पाटील यांचे नाव घालावे लागेल. इंग्रजी भाषेप्रमाणेच मराठी व संस्कृत भाषेवरही त्यांचे प्रभुत्त्व होते. शेक्सपिअरच्या वाङ्मयाचे रकानेच्या रकाने तोंडपाठ होते. त्याचप्रमाणे संस्कृत सुभाषिते, मराठी काव्यपंक्तीही पाठ होत्या. त्यामुळे त्यांचे व्याख्यान निरनिराळे संदर्भ देत व विनोदाचा वापर करत खुलत जात असे. आचार्य अत्रे यांचे व्याख्यान

म्हणजे विनोदाचा खजिना असे. क्रांतीसिंह नाना पाटील यांचे व्याख्यान म्हणजे ग्रामीण उदाहरणे देत लोकांना हसवत ते सर्व सभेचा कब्जा घेत असत. शिवाजीराव भोसले यांचे व्याख्यान म्हंणजे तत्त्वज्ञानात्मक वाहणारी गंगाच वाटते. या सर्वांचा काही प्रमाणात मिलाफ बॅ. पी. जी. सरांच्या भाषणात आढळून येतो. त्यांची व्याख्याने म्हणजे श्रोत्यांच्या दृष्टीने एक आनंदाचा अनुभव असे. त्यांचे भाषण इंग्रजीतील असो अगर मराठीतील असो त्यांच्या बोलण्यात सहजता व सोपेपणा असे. त्यांनी टिपणे काढून कधीच व्याख्याने दिली नाहीत. तास – दोन तास हास्यांचे कारंजे उडवीत वेगवेगळे संदर्भ देत त्यांची व्याख्याने चालत. पण कधी कुणाला कंटाळा येत नसे. काहीवेळा त्यांचे टीकाकार त्यांच्या भाषणावर आक्षेप घेतात की, 'भाषण करताना सर अनेक कवींची आणि विचारवंताची अवतरणे देतात. त्यामुळे त्यांचे मुळ विचार बाजुलाच राहतात, पण हे टीकाकारांचे म्हणणे योग्य नाही. कारण त्यांच्या विद्वत्तेमुळेच ते आपल्या भाषणात अवतरणांचा व काव्याचा उपयोग करू शकत. पण विनोदाच्या वापरामुळे त्यांचे व्याख्यान कधीही रटाळ झाले नाही. अनेक संदर्भ देऊनही ते मुळ विषय सोडून जात नसत. व्याख्यान देत असताना ते स्वतःच नाटकातल्या एखाद्या पात्राप्रमाणे तन्मय होऊन जात असत. वेगवेगळ्या प्रसंगानुसार त्यांच्या भावमुद्रा बदलत असत. त्यांच्या भाषणाबद्दल निर्मलकुमार फडकुले म्हणतात, "बॅ. पी. जीं. च्या व्याख्यानात एक अनिवार्य, सुंदर जोश आढळतो. त्यांच्या स्वरातले, शब्दातले व व्यक्तीमत्त्वातले वात्सल्य, मर्मभेदक विनोद बुद्धी, कधीतरी डोकावणारा वाक्य मिस्कीलपणा, मुद्रेवरील बोलके भाव, स्वरातील आरोह – अवरोह, वृत्तीतील सळसळता ताजा उत्साह हे सर्व घटक त्यांच्या व्याख्यानात एकत्र आले आहेत. एखादे नाटक जसे रंगत जाते. त्याप्रमाणे बॅ. पी. जीं.चे भाषण म्हणजे एकपात्री नाटक असे. रंजकता, रोचकता, काव्यत्मकता आणि अंतर्मुख करणारी विचारशीलतां यांच्या उभ्या आडव्या धाग्याने विणलेले एक मोहक वस्त्र असते."[१०]

बॅ. पी. जी. पाटील यांनी संपूर्ण महाराष्ट्रभर व्याख्याने दिली, परंतु त्याचे त्यांनी कधी मानधन घेतले नाही. काही वक्त्यांप्रमाणे त्यांची ठराविक विषयांवरच व्याख्याने होत नसत. वाङ्मयातल्या एखाद्या विषयापासून ते समाजसुधारकापर्यंत त्यांची निरनिराळ्या विषयावर व्याख्याने होत असत. व्याख्यानासाठी लोक न्यायला आल्यानंतर त्यांनी विद्वत्तेचा अहंमभावपणा दाखवून लोकांना टाळले नाही. त्यामुळे लहान – लहान खेड्यातही त्यांची व्याख्याने होत असत. सामान्यातल्या सामान्य खेडूतापासून, विद्वानातील – विद्वानापर्यंत ते कोणत्याही स्तरातील लोकांच्यापुढे बोलत असत. खेड्यातील सामान्य लोकांना त्यांच्या आवडीप्रमाणे व विद्वत्त जनांना त्यांच्या लेवलप्रमाणे व्याख्यान देण्याचे काम करत असत. हे त्यांचे महत्त्वाचे गुणवैशिष्ट्य होते. रा. कृ. कणबरकर म्हणतात, "बॅ. पी. जी. सरांच्या वक्तृत्वाची व विद्वत्तेची छाप केवळ विद्यार्थी जगतातच नव्हे, तर सामान्य जनातसुद्धा निर्माण झालेली आहे. त्यांच्या व्याख्यानाचे स्वरूप Anecdotal असल्यामुळे कधीही कंटाळवाणे होत नाही. छोट्या प्रसंगातून आपला विषय प्रभावी मांडण्याची त्यांची शैली आहे. व्याख्यानात येणाऱ्या लांबच लांब कोटीशनस्वरून त्यांची स्मरणशक्तीची व अफाट वाचनाची कल्पना येते."[११]

## काटकसरी दानशूर :

बॅ. पी. जी. पाटील यांचे राहणीमान अतिशय साधे होते. ते सदैव खादीचे कपडे वापरत असत. या दांपत्याचे राहणीमान अतिशय काटकसरीचे व सात्विक होते. दोघांच्याही वागण्यात चैनीचा लवलेश नव्हता. त्यांच्या घरात उंची फर्निचर अगर मौल्यवान वस्तू आढळत नाहीत. त्यांनी साधे दुचाकी वाहन कधी वापरले नाही. त्यामुळे बऱ्याचवेळा काहीजण त्यांच्या माघारी त्यांना कंजुष म्हणत तर काहीजण त्यांच्या काटकसरीबद्दल टीकाही करत, पण सरांनी ही निंदा कधी मनावर घेतली नाही. आयुष्यभर त्यांनी पै – पै साठवली, काटकसर करून पैसा वाचवला. हा सर्व पैसा त्यांनी दुसऱ्यासाठी खर्च केला. आपल्या घरी येणाऱ्या लेबर स्किमच्या

विद्यार्थ्यांना मदत केली. काहींना कपडे दिले. मिळविलेला सर्व पैसा त्यांनी निरनिराळ्या संस्थांना दान म्हणून देऊन टाकला. आपल्या मृत्युपत्राद्वारे त्यांनी लाखो रूपये अशा प्रकारे दान केले आहेत. स्वत: कोणताही ऐहिक उपभोग न घेता, चैनी जीवन न जगता मिळालेला सर्व पैसा या जोडप्याने समाजासाठी व गोरगरीबांसाठी खर्च केला. म्हणूनच त्यांना काटकसरी दानशूर असेच म्हणावे लागेल.

रयत शिक्षण संस्था हाच त्यांचा संसार होता. बॅ. पी. जी. पाटील व सौ. सुमतीबाई पाटील हे शिवाजी कॉलेजवर नोकरी लागल्यानंतर ते या संस्थेच्या कार्यातच रमून गेल्याचे दिसतात. रयत शिक्षण संस्थेच्या ट्युटर, प्राध्यापक, प्राचार्य व नंतर सचिव अशा निरनिराळ्या पदावर त्यांनी काम केले. संस्थेचा विस्तार भरभराट व यश हे त्यांनी आपले यश मानले. रयत शिक्षण संस्थेत त्यांच्या शब्दांना मान होता. बॅ. पी. जी. पाटील यांचा कोणताही निर्णय डावलला जात नसे. रयत शिक्षण संस्थेचे काम करत असताना त्यांनी कधीही पदाची व वयाची आडकाठी बाळगली नाही. कुलगुरूपदाची जबाबदारी संपल्यानंतर ते पुन्हा प्राध्यापक म्हणून तास घेऊ लागले होते.त्यात त्यांना कसलाही कमीपणा वाटला नाही. आयुष्याच्या अखेरच्या क्षणापर्यंत ते रोज संस्थेच्या विकासाबद्दल अडी--अडचणींबद्दल चौकशी करत असत. संस्थेच्या होणाऱ्या निरनिराळ्या कार्यक्रमांना हजर राहत असत. त्यांचे सर्व जीवनच संस्थामय झाले होते.

कुलगुरू म्हणूनही त्यांचा कालखंड चांगला गेला. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे सदस्य असताना त्यांनी अतिशय काटेकोरपणे परीक्षा घेतल्या. त्यामुळे खेड्यापाड्यातील अभ्यासू व कष्टाळू मुलांना आपोआपच न्याय मिळाला. त्यामुळे त्यांच्या काळात खेड्यापाड्यातील अनेक मुले मामलेदार, बी.डी.ओ. व फौजदार इ. पदावर निवड झालेले दिसून येतात. त्यांच्यानंतर सौ. सुमतीबाई पाटील या प्रथम लोकसेवा आयोगाच्या सदस्या झाल्या व नंतर अध्यक्षाही झाल्या. त्यांनीही अतिशय सुसुत्रपणे परीक्षा घेऊन एक नवी प्रशासकीय घडी बसवून दिली.

बॅ. पी. जी. पाटील यांना आयुष्यात त्यांच्या कर्तृत्वाने अनेक सन्मान पत्र व पुरस्कार मिळाले. त्यामुळे भारतीय स्वातंत्र्य लढ्यात सक्रीय भाग घेतला होता. त्यांनी भारतीय स्वातंत्र्य संग्रामात केलेल्या कामगिरीच्या गौरवार्थ १५/०८/१९६७ रोजी महाराष्ट्र शासनाने त्यांना सन्मानपत्र दिले. १९९९ पासून ते रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्षही होते. त्यांच्या शैक्षणिक कार्याबद्दल त्यांना माधवराव धुमाळ आणि तात्यासाहेब रेठरेकर या पुरस्काराने गौरविण्यात आले. चतुरंग प्रतिष्ठानच्या वतीने दिला जाणारा 'जीवन — गौरव' पुरस्कारही त्यांना २३ डिसेंबर २००१ रोजी देण्यात आला. त्यामुळे त्यांच्या सामाजिक कार्याचे उचित मोजमाप झाले. लहानपणापासून आपल्या बुद्धीच्या जोरावर चमकत राहणारा हा तारा आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत चमकतच राहिला.

कर्मवीर आण्णांच्या संस्कृतीत वाढलेल्या या पांडुरंगावर आयुष्याच्या अखेरपर्यंत कर्मवीरांच्या विचारांचा प्रभाव राहिला होता. खाजगी बोलण्यापासून ते व्याख्यानापर्यंत ते आण्णांच्या सदैव आठवणी काढत व हळवे होऊन त्यांच्या डोळ्यात पाणी येत असे. भाई माधवराव बागल म्हणतात, "कर्मवीर भाऊरावांच्या विषयी अनन्य साधारण भक्ती मी बॅ. पी. जीं. च्यात पाहिली. व्याख्यान कोठेही व कोणत्याही विषयावर असो. त्यात परमपूज्य भाऊरावांविषयी भक्ती प्रकट होणारच."[१२] मनाने, विचाराने भावूक असलेले बॅ. पी. जी. उर्फ दादा हे वृद्ध झाले तरी भावूकच राहिले होते. असे हे निर्मोही, निर्लोभी, निष्कपटी, मनाने निर्मळ असणारे व्यक्तीमत्त्व १ जुलै २००३ रोजी रात्री सव्वा नऊ वाजता अनंतात विलिन झाले.

## संदर्भ व तळटीपा :

१. माळी शिवराम (संपा) 'उदयंती' संभाजीबाबा थोरात लेख — 'रयतभूषण', पृष्ठ क्र. १५२, १५३.

२. माळी शिवराम (संपा) 'उदयंती' दिनकर द. पाटील लेख — 'मिश्र महाविद्यालयाच्या पहिल्या प्राचार्या' पृष्ठ क्र. ५७

३. दैनिक सकाळ, पाटील एन. डी.यांचे विचार — ७/७/२००३

४. दैनिक सकाळ, कणबरकर रा. कृ. यांचे विचार — ०३/०७/२००३

५. माळी शिवराम (संपा) 'उदयंती' गायकवाड आर. डी. लेख — 'प्रेमाची पाखर' पृष्ठ क्र. २७.

६. माळी शिवराम (संपा) 'उदयंती' कणबरकर रा. कृ. लेख — 'व्रतस्थ जीवन' पृष्ठ क्र. १९५

७. भगत रा. तु. (संपा) 'ज्ञानयोगी बॅ. पी. जी. पाटील' — द. ता. भोसले लेख — 'ज्ञानदानाचे फिरते विद्यापीठ' पृष्ठ क्र. ४४२

८. 'रयत शिक्षण संस्थेची — रयत शिक्षण पत्रिका' बॅ. पी. जी. पाटील विशेषांक — १९७५, पृष्ठ क्र. ६

९. माळी शिवराम (संपा) 'उदयंती' देसाई पी. के. लेख — 'आदर्श प्रशासक' पृष्ठ क्र. २२६

१०. माळी शिवराम (संपा) 'उदयंती' फडकुले निर्मलकुमार लेख — 'प्रसन्न वाणीचा प्रभावी वक्ता' पृष्ठ क्र. ४०, ४१

११. माळी शिवराम (संपा) 'उदयंती' कणबरकर रा. कृ. लेख — 'व्रतस्थ जीवन' पृष्ठ क्र. १९६

१२. भगत रा. तु. (संपा) 'ज्ञानयोगी बॅ. पी. जी. पाटील' बागल भाई माधवराव यांचा विचार — पृष्ठ क्र. ७२२